# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com


आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–६ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १२ सप्टेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## गणेश विसर्जन दिवशी झाड कोसळून मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटूंबियांना तात्काळ मदत करा!




### भाजपचे कृष्णा पाटील यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालिका आयुक्तांकडे मागणी

**ठाणे:**–गणेश विसर्जन दिवशी झाड कोसळून मृत्युमुखी पडलेल्या ठाण्यातील महिलेच्या कुटूंबियांना व जखमींना राज्य शासनाच्या वतीने मदत जाहीर करावी अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

पालिकेच्या दुर्लक्षा मुळे ही दुर्दैवी घटना घडली असल्याने पालिकेने ही बाधित कुटूंबाला तातडीने मदत करावी अशी मागणी त्यांनी पालिका आयुक्तांकडे देखील केली आहे. पालिका प्रशासनाकडे वारंवार विनंती अर्ज व मागणी करूनही ठाणे महापालिका प्रभाग क्रमांक ११ मधील धोकादायक वृक्ष व झाडांच्या फांद्या संबंधित अधिकारी यांनी न तोडल्याने सौ.अर्पिता वालावलकर या महिलेला गणेश विसर्जन दरम्यान झाड कोसळून झालेल्या दुर्दैवी अपघातात जीव गमवावा लागला. या महिलेच्या मृत्यूस महापालिका वृक्ष प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी जबाबदार आहेत असे कृष्णा पाटील यांनी म्हटले आहे. संबंधित अधिकारी यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करावा.तसेच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांना तात्काळ राज्य शासनाच्या मार्फत मदत करावी अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

कोलबाड, जागमाता मंदिर परिसरात सदर दुर्दैवी दुर्घटना होऊन सौ.अर्पिता वालावलकर यांचे निधन झाले.यामध्ये किमान चार ते पाच लोक जखमी आहेत. वारंवार मागणी करूनही अधिकारी,कॉन्ट्रॅक्टर लक्ष देत नसल्याने नागरिकांच्या जीविताकडे यांचे दुर्लक्ष झाले आहे.

**प्रभाग क्रमांक ११ मधील धोकादायक झाडे तोडा अशी मागणी करूनही कारवाई न करणाऱ्या अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर वर सखोल चौकशी करून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी कृष्णा पाटील यांनी केली आहे.**

# दिव्यातील समस्यांवर मनसेचा बॅनर वार!




दिवा शहरातील प्रश्न मागील अनेक वर्षे प्रलंबित राहिल्याने ते प्रश्न पुढच्या वर्षी तरी सुटावेत तशी बुद्धी पालिका प्रशासनाला द्यावी अशी विनंती गणरायाला करणाऱ्या आशयाचे बॅनर मनसेचे आमदार राजू पाटील यांनी शहरात लावले आहेत.

दिवा आगासन रस्ता मागील पाच वर्षात पूर्णत्वास न गेल्याने यावर भाष्य करणारा बॅनर मनसेने या रस्त्यालगत लावला असून पुढच्या वर्षी तरी हा रस्ता पूर्ण व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याच बरोबर दिवा स्टेशन रेल्वे ब्रिज उड्डाणपूल देखील मागील काही वर्षे रखडला असून हा ब्रिज सुद्धा लवकर पूर्ण करण्याची बुद्धी संबंधित यंत्रणेला दे अशा आशयाचा बॅनर मनसेने ब्रिज जवळ लावला आहे.एकंदरीत मनसेचे आमदार राजू पाटील यांनी पालिकेच्या गलथान कारभारावर बॅनरच्या माध्यमातून निशाणा साधला आहे.

# अत्याचार प्रकरणी नराधमाला जन्मठेप; विशेष पोस्को न्यायालयाचा निकाल

**ठाणे: मेहुण्याच्या अल्पवयीन मुलीवर वर्षभर अत्याचार करत तिला सात महिन्यांची गरोदर करणाऱ्या ४० वर्षीय नराधम आत्याच्या नवऱ्याला ठाणे अतिरिक्त सत्र (विशेष पोस्को) न्यायालयाच्या न्यायमूर्ती व्ही. व्ही वीरकर यांनी बुधवारी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हा प्रकार जुलै २०१६ ते डिसेंबर २०१७ या कालावधीत गणेशपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. या खटल्यात सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.**

पीडित मुलगी ही १६ वर्षीय असून तिचे वडीलांचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. याचदरम्यान तिची आई तिला सोडून माहेरी निघून गेली होती. त्यामुळे पीडित मुलगीही दिवसभर तिच्या वडिलांच्या आईकडे राहत होती. तर रात्री झोपण्यासाठी (वडिलांच्या बहिणीकडे) आपल्या आत्याच्या घरी जात होती. जुलै २०१६ मध्ये पीडित ही तिच्या आत्याच्या घरी गेली असताना, तिची आत्या झोपी गेल्यावर आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला आणि याबाबत कोणाला काही न सांगण्याची धमकी दिली.

त्यानंतर आरोपी हा तिला धमकी देत, तिच्यावर डिसेंबर २०१७ पर्यंत अत्याचार करत होता. तसेच तिला सात महिन्यांची गरोदर केली. याप्रकरणी गणेशपुरी पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३७६ (२) (एन), ५०६, सह बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,१२ प्रमाणे ०८ फेब्रुवारी २०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्यावर पोलिसांनी तपास करून दोषारोपपत्र ठाणे न्यायालयात दाखल केले. हा खटला ठाणे (विशेष पोस्को) न्यायालयाच्या न्यायमूर्ती वीरकर यांच्या समोर आल्यावर सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी सुनावणी दरम्यान काही पुरावे सादर केले. तसेच ११ साक्षिदार तपासले. ते पुरावे आणि साक्षिदारांची साक्ष ग्राह्य मानून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत, पोस्को कायद्याच्या कलम ६ नुसार जन्मठेप आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १०० दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

# अल्पवयीन मुलीच्या छेडछाडीप्रकरणी आरोपीविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल, २ वर्ष कारागृहाची शिक्षा

**ठाणे** – अल्पवयीन मुलीची छेडछाड काढल्याप्रकरणी ठाणे अतिरिक्त सत्र (विशेष पोस्को) न्यायालयाच्या न्यायमूर्ती व्ही व्ही वीरकर यांनी आरोपी अक्षय राधा शिंदे उर्फ अशोक काटकर (४०) याला दोषी ठरवत. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्यापासून कारागृहात बंदीस्त असलेल्या (२ वर्ष ७ महिने १० दिवसाच्या) कालावधीपर्यंतची शिक्षा सुनावली आहे. हा प्रकार २०१८ मध्ये श्रीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला होता. या खटल्यात सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.

या घटनेच्या वेळी पीडिता मुलगी ही १२ वर्षाची होती. ती कुटुंबियांसह वागळे इस्टेटमध्ये राहत होती. जुलै २०१८ मध्ये पीडित मुलगी घराच्या बाहेर पडल्यानंतर आरोपी अक्षय काटकर (शिंदे) हा तिचा पाठलाग करून तिला रस्त्यात थांबवून बोलण्याची जबरदस्ती करायचा. अशाप्रकारे तो छेडछाड करत या प्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला अटक केल्यानंतर त्याची रवानगी न्यायलयीन कोठडीत झाली. तेंव्हापासून तो न्यायालयाच्या निकालापर्यंत म्हणजे २ वर्ष ७ महिने १० दिवस बंदीस्त होता. सोमवारी या खटल्याचा निकाल लागला. त्यावेळी सरकारी वकील यांनी सादर केलेले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले आणि त्याला शिक्षा सुनावली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफीस पत्ता :–**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे, वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे–४००६१२.

# जिल्ह्यात कोरोनाचे ३ बळी; नव्याने आढळून आले १८८ रुग्ण

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्याचे म्हटले जात असताना, आता नव्याने कोरोना रुग्णांसह या आजाराने मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या गुरुवारी अचानक वाढल्याचे दिसून आले. जिल्ह्यात १८८ नव्या रुग्णांसह तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती जिल्हा आरोग्य प्रशासनाने दिली. तर सक्रिय रुग्णांचा आकडा हा आता एक हजार ५५५ इतका झाला आहे.

ठाणे जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला असून शासनाने देखील कोरोना निर्बंध देखील शिथिल केले. असे असले तरी अद्यापही कोरोना आजार हा पूर्णतः संपुष्टात आला नसून आजही जिल्ह्यात कधी २०० तर कधी ३०० नव्या रुग्णांचा आकडा अधूनमधून पुढे येत आहे. मागील अनेक महिन्यांपासून मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या ० ते २ इतकी होती.

मात्र, गुरुवारी जिल्ह्यात नव्याने १८८ रुग्णांची भर पडली त्याचबरोबर या आजाराने, तिघांच्या मृत्यूची नोंद झालेली आहे. यामध्ये ठामपा क्षेत्रात ५० नवे रुग्णांची तर,एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवलीत २८ , नवी मुंबईत ८०, उल्हासनगरात ९ रुग्णांसह एकाचा मृत्यू झाला. भिवंडीत एकाही रुग्णाची नोंद झालेली नाही. तर, मीरा भाईंदर मध्ये ६ रुग्णांसह एक रुग्ण दगावला आहे. तसेच कुळगाव बदलापूर येथे एक रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर, ग्रामीण भागात नव्याने ५० रुग्ण आढळून आले आहेत.

# ढगफुटीसदृश्य पावसामुळे बाधित झालेल्यांना तातडीने मदत पुरविण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

## मुख्य सचिवांसह पुणे, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्र्यांनी घेतली माहिती

**मुंबई : पुणे, सातारा, रायगड, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यांच्या काही भागात गेल्या काही दिवसांत झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे नागरिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना आवश्यक ती मदत तातडीने पुरविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.**

नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, रायगड जिल्ह्याच्या काही भागांमध्ये ढगफुटीसदृश्य मुसळधार पाऊस झाला आहे. मुख्य सचिवांसह पुणे, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्र्यांनी या अतिवृष्टीची माहिती घेतली असून या पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना तातडीने आवश्यक ती मदत पुरविण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.ढगफुटीसदृश्य पाऊस झालेल्या गावांमध्ये नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत पोहोचविण्याच्या सूचना देतानाच मुख्य सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून नुकसानीची आणि मदतकार्याची माहिती घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए–विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे–६१२ ता/जि–ठाणे राज्य–महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क–८०८०९७७९५५
**संपादक–सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# ठाण्यात तिसरा आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका व विद्या प्रसारक मंडळाचे बी.एन. बांदोडकर विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालय यांचेद्वारे संयुक्तपणे बी.एन. बांदोडकर विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात कार्यशाळेद्वारे करून तिसरा आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विज्ञान व पर्यावरण शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना हवा सर्वेक्षणाबाबतचे प्रत्यक्ष प्रशिक्षणही महापालिकेच्या पर्यावरण विभागाद्वारे देण्यात आले.

जागतिक स्तरावर हवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने २०१९ मध्ये ७४ व्या महासभेमध्ये ७ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस म्हणून साजरा करण्याबाबत ठराव संमत केला आहे. आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा करण्याचा उद्देश हा वायू प्रदूषणाच्या पातळीवर लक्ष केंद्रीत करुन सामूहिक उत्तरदायित्व व सामूहिक कृतीच्या आवश्यकतेबाबत नागरिकांमध्ये जागृती करणे हा आहे. त्यानुसार प्रतिवर्षी विविध संकल्पनांद्वारे जगभर हा दिवस साजरा करण्यात येतो. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवसासाठी 'हवा आपली सगळ्यांची' (ढ्हश -ळी थश ढ्हरीश) ही संकल्पना निश्चित करण्यात आली.

ठाणे महानगरपालिका नेहमीच पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य देते. त्यानुसार, शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता शहरामध्ये नियमितपणे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या आदेशानुसार महापालिकेद्वारे यावर्षी शहरात तिसरा आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे व उप आयुक्त अनघा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महानगरपालिका व विद्या प्रसारक मंडळाचे बी.एन. बांदोडकर विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालय यांनी संयुक्तपणे कार्यशाळेचे आयोजन केले.

या कार्यशाळेत, प्रास्ताविकामध्ये बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य मोझेस कोलेत यांनी वातावरणातील प्रदुषणाची उत्पत्ती व काळानुसार वाढत जाणारे प्रदुषण नियंत्रणाकरिता सर्व देशांद्वारे विविध पद्धतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत अत्यंत सोप्या शब्दांत महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यानंतर ठाणे महापालिकेचे वैज्ञानिक अधिकारी राजू जाधव यांनी हवा सर्वे क्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध पद्धती व संसाधनांचे सादरीकरण केले. त्यानंतर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'हवा आपली सगळ्यांची' (ढ्हश -ळी थश ढ्हरीश) या संकल्पनेवर सादरीकरण केले. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी केंद्र शासनाकडून उपलब्ध अनुदानातून ठाणे महानगरपालिकेद्वारे शहरात राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कृती आराखड्याबाबत सादरीकरण केले. सभागृहातील या कार्यक्रमानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ठाणे महापालिकेच्या फिरत्या प्रयोगशाळेत सर्वेक्षणाबद्दल प्रत्यक्ष प्रशिक्षण महापालिकेच्या क्षेत्र अधिकारी संचिता कडलक यांनी दिले.

## ठाण्यातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना परिवहन सेवा मोफत

**ठाणे :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून ठाणे शहराच्या हद्दीत राहणाऱ्या ७५ वर्षापुढील ज्येष्ठ नागरिकांसाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या सेवेचा लाभ ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना घ्यावा असे आवाहन प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा व परिवहन समिती सभापती विलास जोशी यांनी केले आहे. या सवलतीचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी बी-केंबिन पास केंद्र, कळवा आगार, वागळे आगार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुल्लाबाग) आगार, आनंदनगर आगार, ठाणे स्थानक येथे अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरचे अर्ज पुर्णपणे भरुन त्या अर्जासोबत दोन फोटो, पॅनकार्ड, आधारकार्ड/ रेशनकार्ड, वास्तव्याचा दाखल इत्यादी कागदपत्रे जोडून सदरचा अर्ज सादर करावयाचा आहे.

सदर ओळखपत्र तीन वर्षे कालावधीसाठी असून, त्याकरिता सेवाआकार शुल्क आकार २७ रुपये आकारण्यात येईल. तरी ठाणे शहरातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन सेवेच्यावतीने करण्यात आले आहे.




## कंटेनरच्या इंजिनमध्ये आग

ठाणे: धावत्या कंटेनरच्या इंजिनमध्ये आग लागल्याची घटना रविवारी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास कळवा, पारसिक नगर विसर्जन घाट जवळ घडली. ही आग किरकोळ स्वरूपाची होती. अग्निशमन दलाच्या जवानांना आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. हा कंटेनर पनवेलवरून ठाण्याकडे येत होता. त्यावेळी ही आग लागल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी कळवा पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली होती. या मध्ये कोणालाही दुखापत झाली नाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

## ठाण्यातील ज्ञानेश्वरनगर नाल्यात आढळला मृतदेह

**ठाणे:** येथील ज्ञानेश्वरनगर नाल्यामध्ये एका अनोळखी ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह शुक्रवारी सकाळी आढळून आला. तो मृतदेह नाल्यातून बाहेर काढून वागळे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्यानंतर तो मृतदेह ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दल या विभागांनी धाव घेतली होती. त्या इसमाचा मृत्यू नेमका कश्यामुळे झाला आहे हे शवविच्छेदनाचा अहवाल आल्यावर स्पष्ट होईल. पुढील तपास वागळे इस्टेट पोलीस करत आहेत.

## जमीन खचल्याने घराचा काही भाग मुंब्र्यात कोसळला

**ठाणे:** मुंब्रा, राणा नगर येथील दगडू भांगरे यांच्या घराच्या मागील बाजूचा काही भाग जमीन खचल्याने कोसळल्याची घटना शनिवारी रात्री ११ वाजून १९ मिनिटांच्या सुमारास घडली. याघटनेत मागील बाजूची संपुर्ण भिंत शेजारच्या नाल्यात कोसळली असून उर्वरित घराचा भाग धोकादायक स्थितीत आल्याने घर रिकामे करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

मुंब्र्यात जमीन खचल्याने घराचा काही भाग कोसळला अशी माहिती मिळताच, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. तसेच घर धोकादायक झाल्याने ते तातडीने रिकामी करून घरात राहणाऱ्या एकूण ०६ जणांना सुरक्षेच्या दृष्टीने शेजारच्या घरात नातेवाईकांकडे स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज



# मोबाईलच्या युगातही गणेशोत्सवाच्या मूळ संकल्पनेची जपणूक

## उथळसरच्या गणेशोत्सव मंडळाचे अनोखे उपक्रम

**ठाणे :** मोबाईलमुळे जग जवळ आले असले तरी सणावाराची जी मूळ संकल्पना होती; ती फारच दूर गेली आहे. लोकांना मनोरंजनाची साधने आपल्या हातात मिळाली आहेत. तरीही, जनजागृती, स्थानिकांच्या कलागुणांना वाव देणे अन् लोकांना एकत्र आणण्याची जी मूळ संकल्पना होती; त्या संकल्पनेला अनुसरुन उथळसर येथील महाराष्ट्र स्पोर्टस क्लब संचालित श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गेली ५० वर्षे गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्पोर्टस क्लब संचालित श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची सन १९७३ मध्ये कै. जनार्दन वैती यांनी काही तरुणांच्या साथीने स्थापना केली होती. तेव्हापासून अखंडीतपणे कै. जनार्दन वैती मार्ग उथळसर येथेहा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. वैविद्यपूर्ण आरास आणि देखाव्यामुळे या गणेशोत्सवाला दरवर्षी हजारो भाविक भेट देत असतात. यंदा या गणेशोत्सवाचे ५० वे वर्ष आहे. कोणत्याही प्रकारचा बडेजावपणा न करता देखाव्यापेक्षा प्रबोधनात्मक आणि सांघिक कार्यक्रमांवर या गणेशोत्सवामध्ये भर दिला जात आहे. समाजाच्या हिताचे अनेक उपक्रम गेले काही दिवस या मंडळाच्या वतीने राबविण्यात येत आहेत. गणरायाचे आगमन झाल्यापासून या मंडळाच्या वतीने विविध लोकोपयोगी उपक्रमांवर भर दिला जात आहे.



या ठिकाणी वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागण्यासाठी विज्ञानातून जादूचे प्रयोग २ सप्टेंबर रोजी सादर करण्यात आले. त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मंडळाच्या सर्वच सदस्यांनी रक्तदान केले. परिसरातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, निंबध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राची संस्कृती नवतरुणांना उमगली पाहिजे, या उद्देशाने महाराष्ट्राची लोककला या कार्यक्रमाचे सादरीकरण दादूस आणि वेदांत जमागावकर यांनी केले. त्याशिवाय, मोहम्मद रफी यांच्या गाण्यांचा कार्यक्रम; ग्रामीण भागातील कलावंतांना मंच उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांची भजने आदी कार्यक्रमांचे आयोजन या मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

दरम्यान, मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी, उपाध्यक्ष विनोद वैती, कार्याध्यक्ष गोकुळ सोनाळकर यांच्या संकल्पनेतून गणेश विसर्जनाची अनोखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीमध्ये शिवरायांचा जिवंत इतिहास साकारण्यात येणार आहे, असे मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी यांनी सांगितले. हे मंडळ केवळ गणेशोत्सवापुरते मर्यादीत राहिलेले नाही. या मंडळाच्या वतीने आजवर अनेक विधायक कामांमध्ये आपला सहभाग नोंदविला आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या या मंडळाने कोविडच्या काळातही आपली सेवाभावी वृत्ती जोपासली आहे. वाडवडिलांनी लावलेले हे रोपटे आज तिसरी पिढी जोमाने सांभाळत आहे. या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर करण्याची आमची संकल्पना असून या पुढे सामाजिक कार्यामध्ये हे मंडळ अधिक वेगाने कार्यरत राहिल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## ठाण्यात कोसळलेल्या झाडाने घेतला महिलेचा बळी चारजण जखमी तर दोन दुचाकींचे नुकसान

**ठाणे:** येथील कोलबाड, जाग माता मंदीर जवळ असलेल्या कोलबाड मित्र मंडळ या सार्वजनिक गणपतीच्या मंडपात आरती चालू असताना मंडपावर व दोन पार्क केलेल्या गाड्यांवर झाड कोसळल्याची घटना शुक्रवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली. या दुदैवी घटनेत राजश्री वालावरकर ( ५५ ) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर प्रतिक वालावरकर (३०), सुहासिनी कोलुंगडे (५६),कीविन्सी परेरा ( ४०), आणि दत्ता जावळे (५०) हे चौघे जखमी झाले आहेत. याचदरम्यान दोन दुचाकींचे आणि गणपती मंडपाचे नुकसान झाले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.



दोन दिवसांप्रमाणेच शुक्रवारी सायंकाळी ठाणे शहरात पावसाला सुरुवात झाली. त्यातच सर्वत्र अनंत चतुर्दशीला बाप्पा विसर्जनाची लगबग सुरू झाली होती. कोलबाड येथील कोलबाड मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची आरती सुरू होती. त्यातच पावसाळा मोठयाने सुरुवात झाली. म्हणून आडोसा म्हणून काही जण त्या मंडपात उभे राहण्यासाठी गेले असावे. त्यातच अचानक तेथील झाड कोसळले. संपूर्ण झाड मंडपावर पडले नसून त्या झाडाच्या एक ते दोन फांदया मंडपाच्या पुढील बाजूला आल्याने मंडपाचे काही प्रमाणात नुकसान झाले. मात्र, यावेळी पाच जण जखमी झाले. त्यातील राजश्री वालावरकर यांच्या कमरेला दुखापत झाली तर प्रतिक वालावरकर यांच्या उजव्या डोळ्याला व कमरेला दुखापत झाल्याने त्या दोघांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तर कीविन्सी परेरा, सुहासिनी कोलुंगडे आणि दत्ता जावळे या तिघांना किरकोळ दुखापत झाल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचार करत घरी सोडले. तर उपचार सुरू असताना राजश्री वालावरकर यांचा मृत झाला. हे पाच ही जण त्याच परिसरातील रहिवासी आहेत. तर पार्क केलेल्या दोन दुचाकींचे नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

## पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या चिमुरड्याचा मृतदेह सापडला

**ठाणे:** गुरुवारी सायंकाळी झालेल्या अतिवृष्टीमुळे कळवा,भास्कर नगर जवळील डोंगरावरून आलेला पाण्याचा मोठा प्रवाह भास्कर नगर येथील मारुती चाळीत घुसला. त्यावेळी, त्या पाण्याच्या प्रवाहात अभी सिंह मौर्या हा ४ वर्षीय चिमुरडा वाहून गेला होता. त्याचा मृतदेह शुक्रवारी सकाळी राहत्या घरापासून ५०० मीटर अंतरावरील मफतलाल कंपनीजवळील नाल्यात सापडल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

गुरुवारी सायंकाळी झालेल्या अतिवृष्टीमुळे कळवा भास्करनगर येथील डोंगरावरील पाण्याचा मोठा प्रवाह डोंगरजवळील चाळीत शिरला. याचदरम्यान अभी सिंह मौर्या हा चिमुरडा पाण्याचा प्रवाहासोबत वाहून गेल्याची शक्यता तेथील स्थानिक रहिवाशांनी वर्तविली आहे. तथापि प्रत्यक्ष दर्शनी कोणीही ठामपणे सांगत नव्हते. याची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त व कळवा पोलिसांनी धाव घेतली. घटनास्थळ भास्कर नगरमधून मफतलाल कंपाऊंडकडे जाणारा नाला आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान यांच्यामार्फत सुमारे ०३-तास नाल्यामध्ये शोधकार्य करण्यात आले. मात्र रात्रीच्या अंधारामुळे शोधकार्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे कळवा वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनोहर आव्हाड यांच्या आदेशानुसार शोधकार्य थांबविण्यात आले. शुक्रवारी सकाळी ०८:३० वाजण्याच्या सुमारास पुन्हा शोधकार्याला सुरू झाली. त्यानंतर अवघ्या ३० ते ४० मिनिटांतच त्या चिमुरड्याचा मृतदेह मफतलाल कंपनीजवळील नाल्यात सापडला. तो मृतदेह पोलिसांच्या मदतीने शवविच्छेदनासाठी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# अनंत चतुर्दशी दिवशी शहरातील सार्वजनिक ४५१ गणेशमुर्तींसह ५ हजार ५२७ घरगुती बाप्पांचे विसर्जन

**ठाणे** : अनंतचतुर्दशी दिवशी ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण ४५१ सार्वजनिक गणेशमुर्तीसह ५५२७ घरगुती गणेशाचे व ८ गौरींचे महापालिकेच्या सुव्यवस्थित नियोजनामध्ये विसर्जन संपन्न झाले. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणाऱ्या ठाणे महापालिकेच्यावतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रीम तलावांमध्ये यंदाही मोठ्या प्रमाणात भाविकांनी दहा दिवसांच्या गणेश मुर्तीचे विसर्जन केले. यावेळी प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी अधिका-यांसमवेत सर्व विसर्जन घाटांची पाहणी करून सर्व व्यवस्थेचा आढावा घेतली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मासुंदा तलाव येथील विसर्जन घाटावर उपस्थिती लावून गणेशभक्तांना शुभेच्छा दिल्या. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करत महापालिकेच्या विसर्जन व्यवस्थेला नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणे महानगरपालिकेच्यावतीने शहरात दीड दिवस, पाच दिवस, गौरीगणपती विसर्जन, सात दिवस आणि दहा दिवसाच्या सार्वजनिक गणेश विसर्जनासाठी पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्था तयार केली होती. या व्यवस्थेतंर्गत रायलादेवी येथे दोन, आंबेघोसाळे, उपवन पालायदेवी, निळकंठ वुड्स टिकुजीनी वाडी-बाळकुम रेवाळे, खारेगाव आदी ठिकाणी कृत्रीम तलावांची व्यवस्था महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. तर पारसिक रेतीबंदर विसर्जन महाघाट अणि कोलशेत महाघाट याबरोबरच मिठबंदर, कळवा, गायमुख येथे विसर्जन महाघाट निर्माण केले आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मासुंदा तलाव येथील दत्तघाट येथेही पर्यायी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे.

यावर्षी महपालिकेने निर्माण केलेल्या या पर्यायी व्यवस्थेचा लाभ उठवित शहरामधील हजारो भाविकांनी गणपतीचे भक्तिमय वातावरणात विधिवत विसर्जन केले. यावर्षी दहाव्या दिवशी म्हणजेच अनंतचतुर्दशी दिवशी व दिवशी ५५२७ घरगुती गणेशमुर्ती, ४५१ .सार्वजनिक गणेश मुर्ती तसेच ८ गौरींचे विसर्जन करण्यात आले.

शहरातील मासुंदा व आहिल्यादेवी होळकर येथील कृत्रीम तलावामध्ये यावर्षी १७७ घरगुती गणेश मुर्तीचे व २३ सार्वजनिक गणपतींचे विसर्जन करण्यात आले. तर दत्तमंदिर घाट येथे ३११ घरगुती गणेश मूर्तीचे व १० सार्वजनिक गणपतींचे, खारेगाव कृत्रीम तलावात १९५ घरगुती गणेश मुर्तीचे, १७. सार्वजनिक गणपतींचे विसर्जन करण्यात आले. निळकंठवुडस् (मुल्ला बाग) येथे २६६ घरगुती मूर्ती व ४ सार्वजनिक गणपतींचे, आंबेघोसाळे यथील कृत्रीम तलावामध्ये ११४ घरगुती गणेश मुर्तीचे , रेवाळे कृत्रिम तलाव येथे १२३ घरगुती गणेश मुर्ती, १२ सार्वजनिक गणेश मुर्ती , खिड़काळी तलाव येथे ९४ घरगुती गणेश मुर्ती व ४ सार्वजनिक गणपतींचे, शंकर मंदीर तलाव येथे ९१ घरगुती गणेश मुर्ती, २५ सार्वजिनक गणेश मुर्ती , उपवन तलाव येथे ६४१ घरगुती गणेश मुर्ती, ५० सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.

पारसिक तलाव येथे बांधण्यात आलेल्या विसर्जन महाघाट येथे ६४२घरगुती गणेश मुर्ती, ९३ सार्वजनिक गणेश मुर्ती, गायमुख घाट १ येथे ४६४ घरगुती गणेश मूर्ती, ६ सार्वजनिक गणेश मुर्ती तसेच गायमुख घाट २ येथे ४० घरगुती गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. मिठबंदर घाट येथे १६२ घरगुती गणेश मुर्ती, ३१ सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. तर रायलादेवी घाट १ येथे ३६० घरगुती गणेश मुर्ती रायलादेवी घाट २ येथे ४९८ घरगुती गणेश मुर्तीचे, कोलशेत घाट २ येथे ५४२ घरगुती गणेश मुर्ती, ६८ सार्वजनिक गणेश मुर्ती , रेवाळे तलाव येथे १२३ घरगुती गणेश मूर्ती, १२ सार्वजनिक गणेश मूर्तीचे, आत्माराम बालाजी घाट येथे १८ घरगुती गणेश मूर्ती , ३ सार्वजनिक गणपतींचे, काकडे घाट येथे ५७ घरगुती गणेश मूर्तीचे ७ सार्वजनिक गणेश मुर्ती, शंकर मंदिर तलव येथे ९१ घरगुती, २५ सार्वजनिक गणेश मूर्ती तसेच दिवा विसर्जन घाट येथे ६३२ घरगुती गणेश मुर्ती, ९२ सार्वजनिक गणपती तर ८ गौरींचे विसर्जन करण्यात आले. खिडकाळी तलाव येथे ९४ घरगुती गणेश मुर्तीचे तर ४ सार्वजनिक गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

दरम्यान राज्य शासनाच्या मार्गदर्शन सूचनांचे काटेकोरपणे पालन करत महापालिकेच्या विसर्जन व्यवस्थेला नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.यासोबतच महापालिकेने निर्माण केलेल्या पर्यायी विसर्जन प्रक्रियेला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज होती. यामध्ये स्वयंसेवक, महापालिकेचे सुरक्षारक्षक, जीवरक्षक आणि अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्यात आले होते.

# ठामपा आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धेत शिवगर्जना मित्र मंडळ प्रथम

## नवयुग मित्र मंडळ स्वच्छता पुरस्कारामध्ये प्रथम | उत्कृष्ट मूर्तीमध्ये गुणसागरनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ प्रथम

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने आयोजित केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धा २०२२ चा निकाल नुकताच जाहिर करण्यात आला. या स्पर्धेत ठाण्यातील शिवगर्जना मित्र मंडळ, उथळसर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तर स्वच्छता पुरस्काराचे प्रथम पारितोषिक नवयुग मित्र मंडळ, पारशीवाडी यांना तर उत्कृष्ट मूर्तीचे प्रथम पारितोषिक कळव्यातील गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पटकाविले आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विजेत्या मंडळाचे प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी अभिनंदन केले आहे.

ठाणे महापालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धेत ठाण्यातील एकूण १३ मंडळांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षण करताना मूर्ती, सजावट, विषय मांडणी, हेतुपूर्ती, शिस्त व स्वच्छता तसेच कलावंतांचे काम या सर्व घटकांचा विचार करण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षण चित्रकार किशोर नादावडेकर व सदाशिव कुलकर्णी यांनी केले.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकाविलेल्या शिवगर्जना मित्र मंडळ, उथळसर यांनी 'हस्तकला व ओरेगामी कलेपासून सजावट' साकारली होती. तर द्वितीय क्रमांक शिवसम्राट मित्र मंडळ, ठाणे पूर्व यांना मिळाला असून त्यांनी 'साथीचे रोग आणि काळजी' या विषयावर देखावा साकारला आहे. तृतीय क्रमांक सार्वजनिक उत्सव मंडळ, जयभवानी नगर यांना मिळाला असून 'शिवसेना कोणाची' या विषयावरील चित्रफितीद्वारे देखावा त्यांनी साकारला आहे.

स्वच्छता पुरस्कारासाठी द्वितीय पारितोषिक ओमशक्ती विनायक मित्र मंडळ, लेप्रसी कॉलनी, ठाणे यांना तर तृतीय पारितोषिक कोलबाड मित्र मंडळ, कोलबाड यांनी पटकाविले आहे.

उत्कृष्ट मूर्तीकार प्रथम पारितोषिक निळकंठ मोरे – गुणसागरनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळवा, द्वितीय पारितोषिक राकेश गोष्टीकर – श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ, ठाणे तर तृतीय पारितोषिक मिलिंद सुतार-जयभवानी मित्र मंडळ, आझादनगर नं. २, गोकुळनगर ठाणे यांनी पटकाविले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज



# चिपळूणच्या समीर मोरेने पटकाविला भारत श्री किताब, होतेय सर्वत्र कौतुक

## राष्ट्रीय स्पर्धेत सलग दोनवेळा मिळविले सुवर्ण

**चिपळूण:**–चिपळुणातील एन. एस.जी. फिटनेसचा खेळाडू तसेच वाशिष्ठी मिल्क अँण्ड मिल्क प्रोडक्ट कंपनीचा सिक्युरिटी ऑफिसर समीर विकास मोरे याने दि. ३ आणि ४ सप्टेंबर रोजी बंगळुरू येथे झालेल्या राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेत भारत श्री किताब पटकावले आहे. या कामगिरीबद्दल काँग्रेसच्या वाणिज्य व उद्योग विभागाचे प्रदेश सचिव तसेच चिपळूण काँग्रेसचे अध्यक्ष श्री. प्रशांत यादव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी समीरसह त्याचे प्रशिक्षक नंदकिशोर शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.




या स्पर्धेत देशातील १७ राज्यातील १८८ निवडक स्पर्धक सहभागी झाले समिर होते. समीरने त्यांच्यावर मात करीत सुवर्ण पदक पटकाविले आणि चिपळूणसह रत्नागिरी जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. ग्रुप विजेता होताना आणि चॅम्पियन ऑफ चॅम्पियन किताबसाठी दोन्ही वेळेला टाय झाली. पण आपल्या पिळदार शरीर आणि सर्वोत्कृष्ट पोजिंगवर त्याने प्रेक्षक आणि पंचांची मने जिंकली. समीरने दोन महिन्याच्या अंतरात भारत श्री या शरीरसौष्ठव स्पर्धेत सलग दोन वेळा सुबर्ण पदक पटकाविले आहे. त्यामुळे त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असल्याचे त्याचे प्रशिक्षक नंदकिशोर शिंदे यांनी सांगितले. शरीरसौष्ठव खेळ हा खरंतर खर्चिक खेळ आहे. त्यासाठी लागणारा आहार हा सामान्य माणसांना न परवडणारा असून समीर मोरे हा सामान्य शेतकरी कुटुंबातीला मुलगा आहे. पण आपल्या परिस्थितीवर मेहनतीने मात करीत समीर संपूर्ण भारतात अब्बल ठरला आहे. त्यासाठी समीरला आंतरराष्ट्रीय बॉडी बिल्डर नंदकिशोर शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. समीर मोरे आता आंतरराष्ट्रीय स्पर्धेची तयारी करीत आहे. तो देशासाठी शरीरसौष्ठव स्पर्धेत पदक प्राप्त करण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहे. हे स्वप्न तो नक्की पूर्ण करेल, असा विश्वास त्याचे प्रशिक्षक नंदकिशोर शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# अपुऱ्या पावसामुळे संगमेश्वर तालुक्यातील भातशेती संकटात

साखरपा : गेल्या १५ दिवसात पावसाचा जोर पूर्णत: ओसरला असून दिवसभर कडाक्याचे ऊन असते. हवामानातील बदल, अपुऱ्या पावसामुळे संगमेश्वर तालुक्यातील भातशेती संकटात सापडली असून शेतकरी व त्यांचे कुटुंबीय चिंताग्रस्त झाले आहे.

हळवी भातशेती कोणत्याही क्षणी कापण्याची तयारी शेतकऱ्यांमार्फत करण्यात आली आहे. महान जातीच्या भातशेतीला लोंबी फुटण्याची तयारी सुरू झाली असून महिनाभरात ती कापली जाणार आहे. कडक उन्हामुळे भातरोपांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला असून शेतकऱ्यांनी याबाबतची माहिती तालुका कृषि अधिकारी कार्यालयाला कळवली आहे. भातरोपांना अपेक्षित प्रमाणात पाणी मिळत नसल्याने यंदा उत्पन्न कमी होण्याची भिती शेतकऱ्यांमार्फत व्यक्त केली जात आहे. महान भातशेतीला भरपूर पाण्याची आवश्यकता आहे. तुलनात्मदृष्ट्या पावसाने पूर्णतः विश्रांती घेतल्याने पाण्याची उपलब्धता होऊ शकत नाही. अन्य मार्गांनी पाणी आणून ते भातशेतीला देणे शेतकऱ्यांना शक्य होत नाही. भातरोपांवरील विविध रोगांचा प्रादुर्भाव कमी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांनी किटकनाशके फवारण्याची तयारी सुरू केली आहे. कृषि अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार भातरोपांवर किटकनाशकांची फवारणी केली जात आहे. निदान याद्वारे तरी भाताची रोपे अधिक चांगली व्हावी, यासाठी शेतकऱ्यांचा प्रयत्न सुरू आहे. काही भागातील भातरोपांची कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना फवारणीसाठी आवश्यक असलेल्या किटकनाशक वापराबाबतचा सल्ला दिला आहे.

# जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचेबिगुल वाजले, ५१ ग्रामपंचायतींसाठी मतदान निकालाच्या तारखा जाहीर

**रत्नागिरी:**–ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबरला मतदान होईल. यात जिल्ह्यातील ५१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. आजपासून आचारसंहिता लागू झाल्याचे निवडणूक विभागाकडून जाहिर करण्यात आले. राज्यातील १८ जिल्ह्यांतील ८२ तालुक्यांमधील एक हजार १६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून आज जाहिर करण्यात आला. यात संबंधित तालुक्यातील तहसीलदार १३ सप्टेंबरला निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्र २१ ते २७ सप्टेंबर या कालावधीत दाखल करण्यात येतील. शनिवार व रविवारच्या सुटीमुळे २४ व २५ सप्टेंबरला उमेदवारी अर्ज दाखल करता येणार नाही. याची छाननी २८ सप्टेंबरला होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबरला दुपारी तीनपर्यंत असेल. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल.

मतदान १३ ऑक्टोबरला सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होईल. मतमोजणी १४ ऑक्टोबरला होईल. समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात या निवडणुकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा ठेवायच्या आहेत. गणेशोत्सवाची धामधूम संपत आली असतानाच ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. त्यामुळे निवडणूक लागलेल्या ग्रामपंचायतींमध्ये रणधुमाळी सुरू होईल. राज्यात शिवसेनेत सुरू असलेल्या ठाकरे-शिंदे गटातील वादाचा परिणामही या निवडणुकीत दिसून येणार आहे. शिंदे गटात असलेले आमदार योगेश कदम यांच्या विधानसभा मतदारसंघात १३, तर उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या रत्नागिरी मतदारसंघातील चार ग्रामपंचायतींत चुरस पाहायला मिळेल. या ठिकाणी शिंदे सेना बाजी मारणार की ठाकरे सेना याकडे सर्वांचेच लक्ष लागेल.

**येथे होणार निवडणूक** – मंडणगड– २, दापोली– ४, खेड– ७, चिपळूण– १, गुहागर– ५, संगमेश्वर– ३, रत्नागिरी– ४, लांजा– १५ व राजापूर– १० यांचा समावेश आहे.

# मांडवी समुद्रकिनारी पोलिसांकडून साफसफाई

**रत्नागिरी:**– शहरातील मांडवी समुद्रकिनारी सोमवार ५ सप्टेंबर रोजी काही खासगी आणि सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. या नंतरच्या कालावधीतही या ठिकाणी गणपतींचे विसर्जन करण्यात येणार असल्यामुळे मंगळवारोजी रत्नागिरी पोलिसांकडून या किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. डॉ. मोहित कुमार गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी पोलिसांकडून मांडवी किनारी पडलेले निर्माल्य एकत्र करुन किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत पोलिस मुख्यालय रत्नागिरी येथील राखीव पोलिस निरीक्षक रमेश निकम यांच्यासह पोलिस अंमलदार यांनी या सहभाग घेतला होता.



# राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेसाठी ऋतुराज जाधव याची निवड

**जाकादेवी:**–श्री.विठ्ठलराव जोशी ट्रस्टचे क्रीडा संकुल डेरवण येथे रत्नागिरी जिल्हा सब ज्युनिअर डॉजबॉल अंजिक्यपद स्पर्धा व निवड चाचणी महाराष्ट्र राज्य डॉजबॉल यांच्या मान्यतेने रत्नागिरी डॉजबॉल मार्फत घेण्यात आली.या स्पर्धेत खंडाळा इंग्लिश मिडियम स्कूलचा इ.९ वी त शिकणारा ऋतुराज जाधव याने डॉजबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याने जिल्हा संघातून बत्तीस शिराळा येथे होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धेसाठी ऋतुराज जाधव या खेळाडूची निवड करण्यात आली आहे.

ऋतुराज जाधव याला अभ्यासाबरोबरच चित्रकलेची आणि क्रीडाक्षेत्रात कमालीची अभिरुची आहे.त्याने डॉजबॉल खेळाचा चांगल्या प्रकारे सराव करून स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून दाखवली. ऋतुराजला क्रीडाप्रशिक्षक राजेश जाधव यांनी मौलिक मार्गदर्शन केले.तर ग्रामविकास मंडळ वाटद मिरवणे संस्थेचे संस्थापक विष्णुदत्त निमकर,अध्यक्ष संतोष निंबाळकर,स्कूल कमिटी अध्यक्ष बाळ जोग,सचिव सुधाकर शिर्के,सी.ईओ. कारखानीस, मुख्याध्यापक आशिष वासावे,एम.के.शितप सर्व संस्थेचे पदाधिकारी,शिक्षक,शिकेत्तर कर्मचारी यांनी ऋतुराजचे खास अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मध्यमवर्गीयच आता रेल्वेला धडा शिकवतील -डॉ.जितेंद्र आव्हाड

**ठाणे : रेल्वे हा देशातील ऐतिहासिक 'गेंडा' आहे. त्यांना ऊन, वारापाऊस, इंजेक्शन वगैरे काही चालत नाही. त्यांच्यावर असरच होत नाही. पुढील आंदोलन हे आपल्या हातात नाही. तर ते जनतेच्या हातात आहे. मध्यमवर्गीयांच्या मनात आता रेल्वेच्या बाबतीत राग पेटतोय; ते आता रेल्वेला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. जर, सकाळच्या वेळी सर्व प्रवाशी अर्धा तास आधी येऊन रेल्वेस्थानकात फलाटावरच मांडी घालून बसले तर काय होईल? प्रवाशांसमोर बंदूकधारी पोलीस निशस्त्र लोकांना घाबरवतात, हे आता जनता सहन करणार नाही, असा इशारा डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिला.**

एसी लोकलच्या संदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. ते म्हणाले की, एसी लोकलच्या विरोधातील पहिले आंदोलन हे कळव्यातून सुरु झाले. त्यानंतर बदलापूर आणि ठाण्यात झाले. पण, सर्वाधिक प्रतिसाद हा ठाण्यातून मिळत आहे. ठाण्यातून सुटणारी ९ वाजून ३ मिनिटांची एक लोकल रद्द केली आहे. या लोकलमधून सर्व मंत्रालयीन कर्मचारी मुंबईला जायचे. त्याच लोकलच्या वेळेवर आता एसी लोकल चालविली जात आहे. आमचं हेच म्हणणं आहे की एसीच्या १०० गाड्या चालवा; पण, ज्या गरीबांच्या, नोकरदार वर्गाच्या लोकल आहेत त्या साध्या लोकलवर अन्याय का करता? यामुळे शांत असलेले वातावरण अधिक पेटवले जात आहे. एसी लोकलला चांगला प्रतिसाद मिळत असल्याच्या बातम्या रेल्वेकडून प्रसारीत केल्या जात आहेत. पण, एसी लोकलमध्ये नृत्य करता येईल, एवढी ती लोकल रिकामी असते. रेल्वेकडून केला जाणारा चांगल्या प्रतिसादाचा दावा खोटा आहे. कारण, आपण जेव्हा रेल्वेच्या अधिकार्यांची भेट घेतली तेव्हा त्यांनीच सांगितले होते की एका एसी लोकलमधून केवळ ५७० प्रवाशी प्रवास करतात. लोकांची मागणी असेल तर त्या एसी लोकल चालवा. पण, आमच्या साध्या लोकल तुम्हाला बंद करता येणार नाहीत.

कळवा कारशेडमधून निघणार्या या प्रत्येक लोकल या साध्या होत्या. त्या आता बंद करुन त्यांच्या जागी एसी लोकल चालविल्या जात आहेत. ठाणे स्टेशनवर एकाचवेळी सुमारे ५ ते ६ हजार लोक उभे असतात. ते एसी लोकलमध्ये चढत नाहीत. मग, ते कोणत्या लोकलमध्ये चढणार, याचे उत्तर रेल्वे प्रशासनाने द्यायला हवे. हा मुद्दा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा कळवा-मुंब्रापुरता मर्यादीत नाही. याविषयी आता प्रत्येक स्टेशनवर चीड निर्माण होताना दिसत आहे.

गर्दीमुळे मृत्युचे प्रमाण वाढत आहे. माणुसकीशी होणारा हा खेळ आता जर शांतपणे बघणार असू तर आपण राजकारणात राहू नये, असे आपले मत आहे. त्यामुळेच आपण पक्षीय राजकारण न करता केवळ रेल्वे प्रवाशांच्या भुमिका मांडतोय; त्यात आपली राजकीय भूमिका नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुंब्र्यात प्रथमच महाचित्रकला स्पर्धा; २ हजार १७८ विद्यार्थ्यांचा सहभाग

## चार गटात स्पर्धा बक्षिसांची लयलूट

**ठाणे :** मुंब्रा येथे महाचित्रकला स्पर्धेचे यंदा प्रथम राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे २ हजार १७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील विजेत्यांना मोठ्या प्रमाणात बक्षिसे देण्यात आली.

कौसा येथील डायमंड हॉलमध्ये ही स्पर्धा चार गटांमध्ये पार पडली. या स्पर्धेत स्पर्धकांना वयोगटानुसार छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना अबूल कलाम आझाद, अश्फाक खान यांचे पोर्ट्रेट; निसर्गचित्र, माय मुंब्रा आदी विषय देण्यात आले होते.

या स्पर्धेतील प्रत्येक गटांच्या विजेत्यांस प्रथम क्रमांकास सायकल आणि ३ हजार रूपया; द्वितीय क्रमांकास ३ हजार ३००; तृतीय क्रमांकास २ हजार १०० रूपये आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच या स्पर्धेतून ४० सुपर मुंब्रा निवडण्यात येणार असून त्यांना १ हजार १०० रूपये आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांना पदक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ही स्पर्धा आमदार डॉ जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली असून येत्या १३ सप्टेंबरला सायंकाळी ७ वाजता डायमंड हॉलमध्ये पारितोषिक वितरण सोहळा पार पडणार आहे.

# वयोवृद्ध आजीबाईंचा आढळला मृतदेह विहिरीत; कोलशेत परिसरातील घटना

**ठाणे:** कोलशेत खाडी,हनुमान मंदिर जवळ, तरीचा पाडा येथील किरण मिल समोर रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरीमध्ये एका ६५ वर्षीय शारदा मुरलीधर भुरसे या आजीबाईंचा मृतदेह आढळून आल्याची घटना बुधवारी सकाळी समोर आली. तो मृतदेह बाहेर काढून कापूरबावडी पोलिसांच्या ताब्यात आला असून त्या आजीबाई सकाळी सहा ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास घरातून बाहेर पडल्या होत्या. तसेच त्या मनोरुग्ण असल्याची माहिती कापूरबावडी पोलिसांनी दिली.

कोलशेत रोडवरील एका विहिरीत एका महिलेचा मृतदेह तरंग असल्याची माहिती कापूरबावडी पोलिसांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. त्यानुसार घटनास्थळी कापुरबावडी पोलिसांसह आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवानांच्या मदतीने विहिरीमधून मृतदेह बाहेर काढत कापूरबावडी पोलिसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून मयत शारदा भुरसे या सकाळी घरातून बाहेर पडल्या होत्या. तसेच त्या मनोरुग्ण असून त्या कोलशेत परिसरात कुटुंबासह राहत होत्या. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम सोनावणे यांनी दिली.

# आता आनंदनगर आगार येथे प्रवासी पास वितरण केंद्र

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा लाभ घेणाऱ्या घोडबंदर मार्गावरील प्रवाशांच्या मागणीनुसार आनंदनगर आगार येथे प्रवासी पास वितरण केंद्र येत्या १२ सप्टेंबर २०२२ पासून सुरू करण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सोईसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या या सेवेचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा व परिवहन सभापती विलास जोशी यांनी केले आहे. सद्यस्थितीत परिवहन सेवेचे शिवाजीनगर (बी केबीन) येथे पास वितरण केंद्र असून या ठिकाणाहून प्रवासी पास, विद्यार्थी पास, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, दिव्यांग ओळखपत्र, स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र इत्यादी सवलतीचे पास देण्यात येतात. परंतु सदर केंद्रावर जाण्यास घोडबंदर मार्गावरील प्रवाशांना लांब व गैरसोयीचे होत असल्याने घोडबंदर मार्गावर पास वितरण केंद्र सुरू करणेबाबत सातत्याने प्रवाशांकडून मागणी होत होती. या मागणीनुसार येत्या १२ सप्टेंबर २०२२ पासून आनंदनगर येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत पास वितरण केंद्र सुरू करण्यात येत आहे.तरी प्रवाशांनी या सोयीचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन सेवेच्यावतीने करण्यात आले आहे.

# शिवसेना ठाणे जिल्हा शाखा आयोजित श्रीगणेश दर्शन स्पर्धेत मंडळाचा उत्स्फूर्त सहभाग

**(पान ६ वरून)**

तर कल्याण विभागातील खालीलप्रमाणे सार्वजनिक गणेशमंडळाची विजेते म्हणून निवड झाली आहे.

उत्कृष्ट सजावटीसाठी प्रथम क्रमांक शिवनेरी मित्र मंडळ, श्रीराम मंदिरजवळ, जोशीबाग कल्याण (रोख २५ हजार), द्वितीय क्रमांक उत्कर्ष मित्र मंडळ, कै. धोंडिराम यशवंत चौक, रामबाग कल्याण (रोख २१ हजार), तृतीय क्रमांक श्रीमंत बाळ गणेश मित्र मंडळ,वैश्यमंदिर हॉलसमोर कासारहाट कल्याण (रोख १५ हजार) व उत्तेजनार्थ नवतरुण मित्र मंडळ, न्यू विठ्ठलवाडी परिसर, मोहने कल्याण (रोख १० हजार) व शिवनेरी मित्र मंडळ, अंबिका नगर, गोग्रासवाडी, डोंबिवली (रोख १० हजार) यांना प्राप्त झाले आहे.

तर उत्कृष्ट मूर्तीकार म्हणून प्रथम क्रमांक बाळ गणेश मित्र मंडळ, गावदेवी मंदिर,पैलवान विश्वास इश्वाद चौक, कासारहाट, कल्याण मूर्तीकार - प्रशांत गोडांबे ( रोख ११ हजार), द्वितीय क्रमांक जयमहाराष्ट्र मित्र मंडळ, हनुमान मंदिर, पुण्यश्लोक अहिल्याबाई चौक, कल्याण मूर्तीकार किरण उपगावकर ( रोख ७५००), तृतीय क्रमांक दूधनाका गणेशप्रेमी मित्रमंडळ, दूधनाका चौक कल्याण मूर्तीकार जयदीप आपटे ( रोख ५ हजार) तर उत्तेजनार्थ प्रबोधन मित्रमंडळ, जोशीबाग, रामबाग मेनरोड कल्याण मूर्तीकार गणेश कल्याणकर ( रोख ५ हजार)

यावर्षीच्या शिवसेना ठाणे जिल्हा शाखा आयोजित गणेशोत्सव स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी आभार व्यक्त केले असून विजेत्या मंडळांचे अभिनंदन देखील केले.

# एका ८३ वर्षाच्या तरुणाला हे लोक किती घाबरतात - डॉ जितेंद्र आव्हाड

**ठाणे :** शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे केंद्रबिंदू आहेत. त्यामुळे त्यांच्यावर बेलगाम-बेछुट आरोप करीत नाहीत; त्यापर्यंत आपणाला महाराष्ट्राच्या राजकारणात किमंत मिळणार नाही, या प्रकारातून ते लोक हेच मान्य करीत आहेत. मी वैयक्तीक टीका करीत नाही. कोणी उद्ध्वस्त तर कोणी विसर्जन करण्याची भाषा करीत आहेत. आपला त्या शब्दाला आक्षेप नाही. म्हणूनच आम्ही आमच्या भाषेत सांगतो की, कितीही कुळे आली तरी शरद पवार यांच्या नखावरची धुळही ते उडवू शकणार नाहीत, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांना लगावला.

याचदरम्यान पुढे बोलताना, आव्हाडांनी आपल्या एका गोष्टीचेआश्चर्य वाटते की, एका ८३ वर्षाच्या तरुणाला हे लोक किती घाबरतात. बारामतीचा गड जिंकून दे असं साकडं बारामतीच्या मारूतीच्या देवळात जाऊन आज कुणीतरी घातलं. ६० वर्षे प्रत्येक निवडणूकीचा फॉर्म शरद पवार ह्याच मारूतीच्या समोर उभे राहून नंतर दाखल करतात. आज तो मारुती देवळाच्या बाहेर येऊन हसत हसत विचारत होता. हे आत्ता आलेले ते कोण होते ?

बावनकुळे यांनी शरद पवार यांचे बारामतीमध्ये विसर्जन करण्याची भाषा केली होती. त्यांच्या या वक्तव्याचा डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले की, महाराष्ट्राला १९९३ ते ९५ चा काळ आठवत असेल. मुंबईमध्ये गो.रा. खैरनार आणि भाजपचे तत्कालीन मोठे नेते गोपीनाथ मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर बेछुट आरोप केले. अन् शरद पवार यांना बदनाम करण्याचे षडयंत्र रचले. तेव्हा एक लक्षात आले की पवारांवर आरोप केला की पेपरची हेडलाईन मिळते तसेच वाहिन्यांवर मुख्य बातमी म्हणून पुढील १२ तासाची सोय होते. त्यानंतर १९९९ ते २०१४ या काळात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेवर होती. त्यानंतर आताही अडीच वर्षे आम्ही सत्तेत होतो. पण, भारताच्या राजकारणात उद्ध्वस्त करु, विसर्जन करु, असा शब्दप्रयोग कधीही आणि कुणीही केलेला नाही. असे शब्द वापरणार्यांना त्यांचे शब्द लखलाभ असो. पण, आपण त्यांना एवढेच सांगू इच्छितो की ५२ कुळे नाही; १ लाख कुळे जरी उतरले ना, तरी या सह्याद्रीच्या पहाडाला म्हणजेच शरद पवार यांना काहीही फरक पडणार नाही. त्यांच्या पायाच्या नखावरील धूळही तुम्ही उडवू शकणार नाहीत; आपणाला एका गोष्टीचेआश्चर्य वाटते की, एका ८३ वर्षाच्या तरुणाला हे लोक किती घाबरतात. बारामतीचा गड जिंकून दे असं साकडं बारामतीच्या मारूतीच्या देवळात जाऊन आज कुणीतरी घातलं. ६० वर्षे प्रत्येक निवडणूकीचा फॉर्म आदरणीय शरद पवार साहेब ह्याच मारूतीच्या समोर उभे राहून नंतर दाखल करतात. आज तो मारुती देवळाच्या बाहेर येऊन हसत हसत विचारत होता. हे आत्ता आलेले ते कोण होते ?

बावनकुळे यांनी एक लाखांच्या फरकाने विजयी होणार असल्याचे म्हटले आहे, असे पत्रकारांनी विचारले असता, १९८४ साली इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर राजीव गांधी यांची देशात लाट आली होती. त्या ळाटेतही शरद पवार हे प्रचंड बहुमताने विजयी झाले होते. शेवटी काय तर टीआरपीसाठी शरद पवार यांच्यावर टीका केली जात आहे. सध्या देशातील महागाई, बेरोजगारी, चीनची घुसखोरी, महाराष्ट्राची राजकीय स्थिती याच्यावर हे लोक बोलत नाहीत. फक्त शरद पवार यांच्यावरच बोलले जात आहे. या लोकांकडे जनतेपुढे जाण्यासाठी मुद्देच नाहीत. त्यामुळेच ते केवळ शरद पवार यांना लक्ष्य करीत आहेत. पण, उद्ध्वस्त करु, विसर्जन करु अशी भाषा महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीमध्ये कोणीहीही वापरलेली नाही. जय-पराजय हा लोकशाहीचा भाग असला तरी नेत्याने काय शब्द वापरावेत, याचे भान ठेवले पाहिजे. महाराष्ट्राच्या जनतेला सर्वकाही माहित आहे. जे आरोप करण्यात आले अन् त्या आरोपांचे पुढे काय झाले, हे सर्व महाराष्ट्राच्या जनतेला ज्ञात आहे. या कृत्यातून तुमच्या वयाच्या दुप्पट वय असलेल्या माणसाला तुम्ही किती घाबरतात, हेच यातून दिसून येत आहे.

नवी मुंबईमध्ये शिंदे आणि गणेश नाईक यांची भेट झाली, याबाबत विचारले असता, कोणी कोणाला भेटावे, हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे. भारतीय राजकारणाच्या इतिहासात मतभेद असतात; शत्रूत्व नसते. मात्र, गेल्या काही दिवसात मतभेदांना शत्रूत्वाचे स्वरुप येत आहे. ते अत्यंत धोकादायक आणि गलिच्छ आहे. राजकारणात मैत्री असू शकत नाही का? देशाच्या पहिल्या मंत्रिमंडळात हिंदू महासभेच्या श्यामाप्रसाद मुखर्जी यांना पंडीत नेहरुंनी कॅबिनेट मंत्रिपद दिले होते. भारताची हिच परंपरा आपण विसरत चाललो आहोत, असे सांगून राजीव गांधी यांनी अटलबिहारी वाजपेयींवर केलेल्या उपचारांची आठवण डॉ. आव्हाड यांनी सांगून पवार यांनी त्यांच्यावर टीका करणार्या शेकडो जणांना मदत केली आहे. कोणताही द्वेष मनात ठेवला नाही. त्यांनी कधीच कंबरेखालचे वाट केले केले नाहीत, असेही स्पष्ट केले.

